राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२५/प्र.क्र.५/का-६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दिनांक - ०४/०८/२०२५.

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व),

विषय:- राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतींची प्रभाग रचना करण्यासंदर्भातील अधिकार प्रदान करण्याबाबत...

संदर्भ:-१) नगर विकास विभागाचे क्र. एमसीओ-२०२५/प्र.क्र.२४२/ नवि-१४, दि. १२/०७/२०२५ व दि. २३/०६/२०२५ चे पत्र.
२) आयोगाचे समक्रमांकाचे दि. १६/०६/२०२५ चे आदेश.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन क्र.१ च्या दि.२३/०६/२०२५ च्या पत्रान्वये शासनाच्या नगर विकास विभागाने प्रभाग रचनेकरिता वेळापत्रक निश्चित केले असून, सदर वेळापत्रकात अ.क्र. ४ येथे "प्रारुप प्रभाग रचनेचे प्रस्ताव नगर विकास विभागाने राज्य निवडणूक आयोगास पाठविणे" असे नमूद केले आहे.

२. संदर्भाधीन क्र. २ अन्वये प्रारुप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाने संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान केलेले आहेत. (अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे)

३. शासनाने दिलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित मुख्याधिकारी हे प्रारुप प्रभाग रचना तयार करीत असून, सदर प्रभाग रचनेचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत वेळापत्रकात नमूद करण्यात आले आहे. शासनाने प्रारुप प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे किंवा आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने स्वत:चे अधिकार विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन यांना प्रदान केले आहेत. त्याअनुषंगाने प्रारुप व अंतिम प्रभाग रचनेचे प्रस्ताव नगर विकास विभागाने संबधित विभागीय आयुक्त यांना पाठविणे आवश्यक आहे.

४. शासनाकडून प्राप्त झालेले प्रारुप व अंतिम प्रभाग रचनेचे प्रस्ताव तसेच प्रभाग सरासरी लोकसंख्येपेक्षा किमान व कमाल मर्यादेपेक्षा जास्त किंवा कमी होत असल्यास तसेच इतर अनुषंगिक मुद्दयांवर विहित पध्दतीने तपासणी करून विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपालिका प्रशासन यांनी प्रारुप व अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे बंधनकारक आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

08.06.2024

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) नगर विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई

२) जिल्हाधिकारी (सर्व),

२/- त्यांना कळविण्यात येते की, प्रारुप व अंतिम प्रभाग रचनेचे प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करू नयेत.

३) नगरपरिषद/नगरपंचायतींचे मुख्याधिकारी (सर्व)